# जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समिती (दिशा) सभा

## गुरुवार, दिनांक १० सप्टेंबर, २०२० रोजी (Webex व्दारे Online) झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

गुरुवार दिनांक १० सप्टेबर, २०२० रोजी सकाळी ११.०० वा. समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे वेबेक्सव्दारे ऑनलाईन आयोजित जिल्हा विकास समन्वय व संनियंत्रण समिती (दिशा) बैठकीमध्ये सभेचे अध्यक्ष तथा खासदार मा. श्री. कपिल पाटील, सह अध्यक्ष तथा खासदार, मा.श्री.श्रीकांत शिंदे, जिल्हाधिकारी, श्री. राजेश नार्वेकर व मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. ठाणे श्री. हिरालाल सोनवणे तसेच Online उपस्थित सर्व सन्मा.आमदार, मा.महापौर, आयुक्त, उपायुक्त व इतर अधिकारी यांचे प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. श्रीमती डॉ. रुपाली सातपुते यांनी प्रथम स्वागत केले.

मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ठाणे यांनी विषयपत्रिकेनुसार सभेच्या कामकाजास सुरुवात करणेपूर्वी सर्वप्रथम मा.अध्यक्ष यांच्या सूचनेनुसार मागील सभेत उपस्थित झालेल्या मुद्दयांवरील कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर विषयपत्रिकेनुसार बैठकीचे कामकाजास सुरुवात करण्यात आली.

**विषय क्रमांक १ :- दिनांक २९ जानेवारी, २०२० रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे व त्यावरील कार्यवाहीचा आढावा.**

प्रकल्प संचालक डॉ सातपुते यांनी सर्व सन्मा. सदस्यांना इतिवृत्त दिले असल्याचे सभागृहास अवगत केले. इतिवृत्तात कोणतीही सुधारणा प्राप्त झाली नसल्याचे प्रकल्प संचालक यांनी अवगत केले असता, मा. अध्यक्ष यांनी पुढील विषयाला सुरुवात करण्यास सांगितले.

मा. अध्यक्ष - कोविडच्या पार्श्वभूमीवर आजची दिशा समिती सभा आयोजित केलेली अभून आजच्या सभेस उपस्थित मा.जिल्हाधिकारी, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे तसेच प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व इतर online सन्मा. सदस्य व विविध विभागाचे अधिकारी यांचे स्वागत करुन, दिशा समिती सभा घेणेबाबत केंद्र सरकारचा असा उद्देश आहे की, केंद्र सरकारच्या निधीबाबत नियमितपणे आढावा घेणे, केंद्र सरकारच्या निधीमधुन कोण कोणती कामे सुरु आहेत याबाबतची माहिती केंद्र सरकारला देणे.

महानगरपालिकांना विकास कामांकरिता केंद्र सरकारचा निधी दिला जातो. परंतु जनतेला याची माहिती नसते. कारण महानगरपालिका केलेल्या कामांवर स्थानिक नगरसेवक व मनपा यांचे नांव देतात. त्यामुळे सदर भागातील जनतेला केंद्र सरकारकडून किती निधी प्राप्त झाला याबाबत माहिती होत नसल्याबाबत नाराजी व्यक्त केली. कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीमध्ये ओला व सुका कचरा यासाठी स्वतंत्र कचराकुंडी पुरविण्यात आल्याचे टिपणीवरुन निर्दशनास आलेले आहे. परंतु डस्टबिनवर स्थानिक नगरसेवकांची नांवे देण्यांत येतात. केंद्र सरकारकडून कल्याण-डोंबिवली मनपा ला किती निधी प्राप्त झाला याबाबत सविस्तर माहिती द्यावी अशा सूचना केल्या.

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका -**

शहर इंजिनियर, श्रीमती कोळी कल्याण डोंबिवली महानगरपालिका - स्वच्छ भारत अभियान अंतर्गत एकूण र.रु.१९.०० कोटी निधी प्राप्त झाला असून, त्यामध्ये केंद्र सरकारचे र.रुपये १२.०० कोटी व राज्य सरकारचे र.रु.७.०० कोटी निधी आहेत. म.न.पा. हद्दीमध्ये ज्या कचराकुंडया पुरविण्यात आलेल्याआहेत ते मनपा निधी मधून पुरविण्यात आले असल्याचे सभागृहास अवगत केले.

मा.अध्यक्ष-मनपानिधीमधूनकेलेल्याकामाचीमाहितीदिशासमिती
ला देण्याची आवश्यकता नाही असे अवगत करुन, केंद्र शासन, राज्य शासन व महानगरपालिका यांच्या निधी व कामांची विगतवारी सभागृहाला अवगत करावी अशा सुचना दिल्या.

डॉ.विजय सुर्यवंशी, शहर इंजिनियर, कल्याण डोंबिवली महानगरपालिका - केंद्र सरकार रुपये ९४.०० कोटी राज्य सरकार रुपये ८९.०० कोटी एवढा निधी प्राप्त झालेला असून यामध्ये ३०% केंद्र सरकार, ३०% राज्य सरकार व ४०% मनपा हिस्सा असल्याचे सभागृहास अवगत केले. यामध्ये मोठया कामामध्ये उंबर्डे प्रकल्प (बायोगॅस प्रकल्प) कार्यान्वित झाला असल्याचे सभागृहास अवगत केले. ३३ मे.टन शेडचे काम पूर्ण झाले आहे. तसेच, सिग्नल यंत्रणा व सी.सी.टि.व्हि. यंत्रणा कार्यन्वित केली आहे अशी माहिती त्यांनी दिली.

मा.अध्यक्ष - स्मार्ट कल्याण योजनेमधून सीसीटीव्ही बसविण्यासाठीच्या किती निविदा काढणेत आल्या व कोणत्या ठिकाणी सीसीटीव्ही बसविण्यात आलेले आहेत. तसेच त्यामध्ये केंद्र, राज्य व मनपा हिस्सा किती याबाबत तसेच सीसीटीव्ही निविदेचे दर याबाबत Email वर माहिती द्यावी अशा सूचना केल्या.

शहर इंजिनियर, कल्याण डोंबिवली महानगरपालिका - रक्कम रुपये १४८.०० कोटी एवढया रकमेची निविदा असून ५ ठिकाणी २२ कॅमेरे बसविण्यात आलेले असल्याचे केंद्र शासन ५०%, राज्य शासन २५% व मनपा २५% असा हिस्सा असून, काम प्रगतीपथावर असून, सीसीटीव्ही च्या दराची माहिती Email द्वारे देत असल्याचे सभागृहास अवगत केले.

मा. अध्यक्ष - सदर योजना राबविण्यात आली त्या ठिकाणी केंद्र सरकारचे नावाचा फलक लावण्यात आलेला आहे काय? त्याचप्रमाणे सदर काम करणेपूर्वी स्थानिक खासदार यांना विश्वासात घेतले का अशी विचारणा करुन, देयक अदा करणेबाबतची विगतवारी व आत्तापर्यंत किती देयक अदा केले याबाबत माहिती द्यावी.

शहर इंजिनियर, कल्याण डोंबिवली महानगरपालिका - निविदा प्रक्रियेमध्ये नमुद केल्याप्रमाणे देयक अदा करण्यात येत असून, आत्तापर्यंत रक्कम रुपये २०.०० कोटी एवढे देयक अदा केलेले असल्याचे सभागृहास अवगत केले.

Scanned with CamScanner

मा. अध्यक्ष - सदर कामाबाबत मा. अध्यक्ष यांनी नाराजी व्यक्त करुन, आत्तापर्यंत झालेल्या सदर कामाची व अदा केलेल्या देयकाबाबतची सविस्तर माहिती सर्व स्थानिक खासदार यांना तात्काळ त्यांचे Email वर देण्यात यावी. तसेच, सदरचे संपूर्ण काम जबाबदार अधिकारी यांनी माझ्यासोबत समक्ष येऊन दाखविण्यात यावे. त्याचप्रमाणे दिनांक १ ऑक्टोबर नंतर मा. अध्यक्ष व मा. खासदार यांचेशी चर्चा करुन आढावा बैठक आयोजित करण्याच्या सुचना देऊन, जोपर्यंत आढावा बैठक होत नाही तोपर्यंत कोणतेही देयक अदा करु नये तसेच पेमेंटबाबत milestone कसे ठरले आहेत याची माहिती देणेत यावी व काम पूर्ण झालेनंतरच देयक पारित करणेत यावी.

मा. अध्यक्ष - स्मार्ट सिटी या प्रकल्पांतर्गत कल्याणमधिल रस्त्यांबाबतची माहिती दयावी. त्याचप्रमाणे त्यामध्ये केंद्र, राज्य व मनपा निधीचे वर्गीकरण करुन, किती कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत त्याचप्रमाणे सद्या सुरु असलेल्या कामांची माहिती देणेबाबत सूचना केल्या.

शहर इंजिनियर, कल्याण डोंबिवली महानगरपालिका - रक्कम रुपये ८१.०० कोटीची निविदा काढण्यात आलेली असून, यामध्ये केंद्र ५०%, राज्य २५% व मनपा २५% हिस्सा असल्याचे सभागृहास अवगत केले. एकूण सहा कामांच्या निविदा झालेल्या असुन, तीन कामे अंतीम टप्प्यात असून, तीन कामे प्रगतीपथावर असल्याचे सभागृहास अवगत केले. ग्रीन शेड रक्कम रुपये ४.५० कोटी, एकूण रक्कम रुपये ४८३.०० कोटीचे असून त्यामध्ये ५०% मनपा, ३०% केंद्र शासन व २०% राज्य शासन असा हिस्सा असल्याचे सभागृहास अवगत केले.

मा. खासदार श्री. श्रीकांत शिंदे - मा.अध्यक्ष यांनी दिलेल्या सुचना नुसार सर्व माहिती Email द्वारे पाठविण्यात यावी. त्याचप्रमाणे काम झालेल्या ठिकाणी क्षेत्रीय भेटी देणे यासह दिनांक १ ऑक्टोबर नंतर आयोजित बैठकीसाठी अद्ययावत माहिती Email द्वारे पाठविण्यात यावी. बैठकीची तारीख व वेळ घेऊन बैठकीचे नियोजन करणेबाबत सूचना दिल्या.

मा. आमदार श्री. किसन कथोरे - अमृत योजनेमधुन कुशिवली धरण कल्याण डोंबिवली मनपा कडे देण्याचे ठरले होते असा निर्णय घेतलेला असून मनपा काय कार्यवाही केली याबाबत माहिती द्यावी.

शहर इंजिनियर, कल्याण डोंबिवली महानगरपालिका - अमृत योजना ही २७ गावांसाठी असून, कुशिवली धरणाबाबत माहिती घेऊन सादर करण्यात येईल असे सभागृहास अवगत केले.

मा. आमदार श्री. किसन कथोरे - मनपा लक्ष देत नाही. मनपा कडे पाणी उद्भव नाही, कुशिवली धरणाचा मनपा ला पर्याय दिलेला होता, परंतु त्याचा विचार केलेला नसल्याचे सभागृहाचे निदर्शनास आणून दिले.

मा. अध्यक्ष - २७ गावांच्या पाण्यासाठी कुशिवली धरणाचा स्त्रोत आहे. याबावत मा.श्री. कथोरे, आमदार महोदय यांचेसमवेत चर्चा करुन धरणांवरुन वेगळी योजना करणेबाबतची पुढील कार्यवाही तात्काळ करणेत यावी व केलेल्या कार्यवाहीबाबत Email द्वारे माहिती सादर करावी अशा सूचना कल्याण डोंबिवली मनपा ला दिल्या.

शहर इंजिनियर, कल्याण डोंबिवली महानगरपालिका - महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पाणी घेण्यात येत असल्याचे सभागृहास अवगत केले.

**ठाणे महानगरपालिका**

मा. अध्यक्ष - ठाणे मनपा अंतर्गत एकूण किती विकास कामे झाली, कश प्रकारची कामे झाली व त्यासाठी प्राप्त निधीमधिल केंद्र, राज्य व मनपा निधी याबाबत वर्गवार माहिती email व्दारे दयावी अशा सूचना शहर अभियंता मनपा ठाणे यांना दिल्या.

अतिरिक्त आयुक्त, श्री. देशमुख – केंद्र सरकार रक्कम रुपये २४२.९५ कोटी, राज्य शासन रक्कम रुपये १२१.५० कोटी व मनपा रक्कम रुपये २६९.०० कोटी असा निधी असल्याचे अवगत करुन, कामाची प्रगती चांगल्या प्रकारे असून एकूण रक्कम ८०% म्हणजे १९६ कोटी रक्कम खर्च झाल्याचे सभागृहास अवगत केले.

मा. खासदार श्री. श्रीकांत शिंदे - मा.खासदार व मा.आमदार यांचेसोबत दर तीन महिन्यांनी आढावा बैठकीचा आयोजन करावे व त्यामध्ये स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत कामांचा आढावा घेणेत यावा अशा सूचना आयुक्तांना दिल्या.

श्री. फाफडकर, ठाणे मनपा – मागच्या वर्षी आढावा बैठक झालेली असून यावर्षी आढावा बैठक झालेली नसल्याचे सभागृहास अवगत केले.

मा. अध्यक्ष - मागील वर्षीच्या बैठकीला मला आमंत्रीत केलेले नव्हते हे ठाणे मनपा अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देऊन दिशा समिती सभेला माहिती देणे एवढाच या बैठकीचा उद्देश आहे नसून लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन कामे करणे आवश्यक आहे अशाप्रकारे मनपा ठाणे अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

मा. खासदार श्री. श्रीकांत शिंदे - स्मार्ट सिटी प्रकल्पाबाबतच्या बैठका ह्या मनपा आयुक्त स्तरावर घेण्यात येतात लोकप्रतिनिधी यांना विश्वासात न घेता वा आढावा बैठक आयोजित न करता मनपा स्तरावर निर्णय घेत असल्यामुळे नाराजी व्यक्त करुन तीन ते सहा महिन्यामध्ये स्मार्ट सीटी प्रकल्पाबाबतचा आढावा घेणेसाठी बैठक आयोजित करणेबाबत ठाणे मनपा अधिकारी यांना सूचना दिल्या व योजना यशस्वी होणे गरजेचे आहे असे सांगितले.

Scanned with CamScanner

मा. अध्यक्ष - केंद्र सरकारकडून प्राप्त होणाऱ्या निधीबाबत जनतेला माहिती होणे आवश्यक असून, आत्तापर्यंत झालेली कामे, प्रगतीपथावरील कामे, पूर्ण झालेली कामे, काढण्यात आलेल्या एकूण निविदा, निविदेची रक्कम (कामनिहाय), अंदाजपत्रक (Estimate), आत्तापर्यंत झालेला खर्च याबाबतची सर्व माहिती सर्व लोकप्रतिनिधी आम्हा खासदार व सन्मा.आमदार यांना Email द्वारे सादर करावी. तसेच दिनांक १ ऑक्टोबरनंतर मा. खासदार यांचेशी चर्चा करुन आढावा बैठकीसाठी तारीख व वेळ घेऊन बैठक आयोजित करावी. त्याचवेळी क्षेत्रीय भेटी सुध्दा आयोजीत करण्यात याव्यात अशा सूचना ठाणे मनपा अधिकारी यांना दिल्या.

**मिरा भाईंदर महानगरपालिका -**

श्री. विजय राठोड, आयुक्त, मनपा मिरा भाईंदर -

मा. अध्यक्ष - अमृत योजनेमध्ये कोणकोणती कामे सुरु आहेत याबाबतची माहिती द्यावी अशा सूचना केल्या.

आयुक्त, मनपा मिरा भाईंदर - अमृत योजनेमध्ये रक्कम रुपये ९४.०० कोटीचा प्रकल्प असून, त्यामध्ये २२ नाल्यांचे बांधकाम व ०.६ किलोमिटरचे बांधकाम करायचे असून, त्यामध्ये केंद्र सरकार ५०%, राज्य सरकार २५% व मनपा २५% असा हिस्सा असल्याचे सांगितले. पैकी १२ नाला बांधकामाचे कार्यादेश दिलेले असून, ७ कामे पूर्ण आहेत १० सीआरझेड च्या Clearing साठी प्रलंबित होते त्यापैकी ५ Clear केलेले असून उर्वरीत ५ मा. उच्च न्यायालयाकडे प्रस्ताव सादर केलेला असून पाठपुरावा सुरु असल्याचे सभागृहास अवगत केले. तसेच इतर कामे प्रगतीपथावर असलेचे निदर्शनास आणले.

मा. अध्यक्ष - केंद्र सरकारकडून प्राप्त होणाऱ्या निधीबाबत जनतेला माहिती होणे आवश्यक असून, आत्तापर्यंत झालेली कामे, प्रगतीपथावरील कामे, काढण्यात आलेल्या एकूण निविदा, निविदेची रक्कम (कामनिहाय), Estimate, आत्तापर्यंत झालेला खर्च याबाबतची सर्व माहिती सर्व लोकप्रतिनिधी (मा.खासदार/मा.आमदार) यांना Email द्वारे सादर करावी. तसेच दिनांक १ ऑक्टोबर नंतर मा. खासदार यांचेशी चर्चा करुन आढावा बैठकीसाठी तारीख व वेळ घेऊन बैठक आयोजित करावी त्याचवेळी क्षेत्रीय भेटी सुध्दा करण्यात येतील अशा सुचना ठाणे मनपा अधिकारी यांना दिल्या.

मा. महापौर, मनपा मिरा भाईंदर - मिरा भाईंदर शहराला पिण्याच्या पाण्याचा फारच त्रास असून, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंहामंडळाकडे पत्रव्यवहार करुन सुध्दा पाणी मिळत नाही. दिशा बैठकीच्या माध्यमातून यासाठी काही प्रयत्न करावे अशी विनंती केली.

मा. अध्यक्ष - याबाबत पाठपुरावा करण्यात येईल असे अवगत करुन, प्रधानमंत्री आवास योजनेची काही कामे सुरु आहेत का अशी विचारणा केली.

आयुक्त, मनपा मिरा भाईंर - PMAY अंतर्गत एकूण ४६ झोपडपट्टींचे सर्वेक्षण करुन ठेवण्यात आलेले असून, पैकी २ ठिकाणचे प्रस्ताव म्हाडा यांचेकडे पाठविण्यात आलेले होते. म्हाडाकडून सर्वेक्षण होऊन काही त्रुटी काढण्यात आलेल्या होत्या त्या त्रुटींची पूर्तता केलेली असून, म्हाडाकडे प्रलंबित असून, त्यामध्ये एकूण ३२७६ घरकुले असल्याचे सभागहास अवगत केले.

मा. अध्यक्ष - उर्वरीत प्रस्ताव योग्य यंत्रणेकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात यावे अशा सुचना आयुक्त, मनपा मिरा भाईंदर यांना दिल्या. तसेच अमृत योजनेंतर्गत कामांबाबत केंद्र सरकारकडे नोंद झाली पाहिले. कारण MIDC चे पाणी मिळत नाही तसेच वारंवार पत्रव्यवहार करुन काहीही कार्यवाही झालेली नाही. हि बाब पुढे कळविणे आवश्यक आहे. अधिवेशनात विषय घेतलेस यावर मार्ग निघेल, तरी याबाबत मला ई-मेल वर सविस्तर माहिती पाठविणेबाबत सूचना केल्या.

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका -**

श्री. आशीया, आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका - स्वच्छ भारत अभियान अंतर्गत रक्कम रुपये ३४.०० कोटी निधी प्राप्त झालेला असून, केंद्र सरकार रक्कम रुपये १२.०० कोटी, राज्य सरकार रक्कम रुपये ८.०० कोटी त्यापैकी ५०% रक्कम प्राप्त झालेली असून Bio-mining चे काम चालू आहे. यावर मा जिल्हाधिकारी यांनीही प्रथम प्रकल्प असलेमुळे तो यशस्वी झालाच पाहिजे व Covid परिस्थितीत घरे दिली गेली पाहिजे असे सांगितले. यावर, मा आयुक्त ५० घंटागाडी खरेदी करण्यात आलेल्या आहेत. अमृत योजनेमध्ये सन २०१७-१८ मधील खर्च १००% असून त्यातील रक्कम रुपये ४७.०० लाख येणे प्रलंबित असून, यावर्षी सदर योजनेमध्ये निधी नसल्याचे सभागृहास अवगत केले.

मा. अध्यक्ष - प्रधानमंत्री आवास योजनेची काही कामे सुरु आहेत का अशी विचारणा केली.

श्री. आशीया, आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका - बोर्ड कनेक्ट मिटींग आवश्यक असून, रस्त्याच्या कामासाठी रक्कम रुपये ५.०० कोटीचा आराखडा तयार केलेला असून, प्रकल्प असून, रक्कम रुपये १.५० ते २.०० कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. त्याबाबत योग्य नियोजन करुन काम करण्यात येईल असे सभागृहास अवगत केले.

मा. अध्यक्ष - केंद्र सरकारने योजना दिली त्याला रस्ता देण्याची जबाबदारी मनपा ची असून, संबंधित कंत्राटदाराला कार्यादेश दिलेले असून, त्या नुसार काम सुरु करावयाचे असेल तर रस्ता देणे ही जबाबदारी मनपा ची आहे. भिवंडी शहरामध्ये सदरची योजना प्रथमच आलेली असून, त्याबाबत मनपा ने योग्य ती कार्यवाही करावी. काम करायला परवानगी द्या. सदरची योजना परत जाणार नाही याबाबत दक्षता घेऊन काम करावे अशा सुचना मनपा भिवंडी यांना दिल्या.

Scanned with CamScanner

मा. महापौर, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका - निधी अभावी शहरातील मुलभूत कामे होत नाहीत. तसेच एमएमआरडीए मार्फत सुध्दा कामे होत नसल्यामुळे जनतेला फारच त्रास सहन करावा लागतो. यासाठी आजच्या बैठकीच्या माध्यमातून काय करता येईल अशी सभागृहास विचारणा केली.

मा. अध्यक्ष - मा.पालकमंत्री महोदयांशी याबाबत चर्चा करुन निर्णय घेऊ असे सभागृहास अवगत केले.

मा. महापौर, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका - इंडस्ट्री एरीया भिवंडी मधील विकास थांबलेला असल्यामुळे, एमएमआरडीए कडून रस्ते व इतर बाबीसाठी निधी उपलब्ध करुन दिल्यास भिवंडी मनपा ला त्याचा कराच्या स्वरुपात फायदा होईल असे मत व्यक्त केले.

मा. अध्यक्ष - भिवंडी मनपा हद्दीतील रस्त्यांच्या दुरुस्तीबाबत चर्चा /नियोजन करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल असे सभागृहास अवगत केले.

**नवी मुंबई महानगरपालिका -**

कार्यकारी अभियंता श्री. संख्ये -

मा. अध्यक्ष - सर्वप्रथम स्वच्छ भारत अभियान मध्ये तिसरा क्रमांक मिळवल्याबद्दल सर्वप्रथम नवी मुंबई महानगरपालिकेचे अभिनंदन केले. त्यानंतर केंद्र सरकारच्या कोण कोणत्या योजना सुरु आहेत त्याबाबत माहिती द्यावी अशी सुचना केली.

कार्यकारी अभियंता श्री. संख्ये - अमृत योजनेमध्ये एकच प्रकल्प आहे व रक्कम रुपये ४४.०० कोटी, त्यापैकी रक्कम रुपये ४०.०० कोटी प्राप्त झालेली असून, रक्कम रुपये २४.०० कोटी खर्च झालेला आहे. त्यामध्ये राज्य शासनाकडून रक्कम रुपये ६.५० कोटी प्राप्त झाले असल्याचे सभागृहास अवगत केले.

मा. अध्यक्ष - प्रधानमंत्री आवास योजनेचे काम मनपा कडे आहे काय अशी विचारणा केली.

श्रीमती क्रांती पाटील, उपआयुक्त, सामाजिक विकास - प्रधानमंत्री आवास योजनेचे काम मनपा कडे नाही. परंतु मनपा हद्दीमध्ये ४८ झोपडपट्टी असून, सीडको-१७, मऔविम-२९ व २ शासकीय जागेवर असून, याबाबत झोपडपट्टी जागा मनपा कडे हस्तांतरीत कराव्यात यासाठी प्रयत्न केलेला आहे. परंतु, संबंधित प्राधिकरण जागा हस्तांतरीत करण्यास तयार नाही. जागा नसल्यामुळे प्रकल्प राबवू शकत नसल्याचे सभागृहाचे निदर्शनास आणून दिले.

**उल्हासनगर महानगरपालिका -**

आयुक्त, मनपा उल्हासनगर - अमृत योजनेमध्ये एकूण रक्कम रुपये ८५.०० कोटीचा प्रस्ताव असून, त्यापैकी रक्कम रुपये ७५.०० कोटी निधी प्राप्त झालेला असून १००% खर्च झालेला आहे. त्यामध्ये एक गोडाऊन काम पूर्ण झालेले असून, शांतीनगर भागाकडील काम ९५% पूर्ण झाले असल्याचे सभागृहास अवगत केले.

- घरांचे बांधकामासाठी रक्कम रुपये ५.७९ कोटी निधी प्राप्त झालेला असून, रक्कम रुपये १.७३ कोटी खर्च २६०० बांधकामे पूर्ण झालेली आहेत. ५ डीपीआर म्हाडाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आलेले होते त्यापैकी ३ डीपीआर मंजुर झालेले असून, ३ डीपीआर मध्ये १४४१ घरकुले असून, जागेबाबत जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पाठपुरावा सुरु असून, जागा प्राप्त झाल्यावर काम सुरु करण्यात येईल असे सभागृहास अवगत केले.

मा. आमदार श्री. किसन कथोरे - कल्याण-बदलापूर रस्त्याचे एमएमआरडीए कडून टेंडर झालेले असून, त्याचे अतिक्रमण आजतागायत काढण्यात आलेले नाही. त्यामुळे रस्त्याचे काम अर्धवट राहिले असल्याचे सभागृहाचे निदर्शनास आणून दिले.

आयुक्त, मनपा उल्हासनगर - आढावा घेऊन कार्यवाही करण्यात येईल असे सभागृहास अवगत केले.

मा. अध्यक्ष - सदर बाबत तात्काळ कार्यवाही करणेबाबत उल्हासनगर मनपा यांना सुचना दिल्या.

**अंबरनाथ नगरपरिषद -**

डॉ. प्रशांत रसाळ, मुख्याधिकारी -

मा. अध्यक्ष - केंद्र सरकारच्या योजना व निधीबाबत सभागृहाला माहिती द्यावी अशा सूचना दिल्या असतां, डॉ. प्रशांत रसाळ, मुख्याधिकारी यांनी स्वच्छ भारत मिशन या योजनेमध्ये रक्कम रुपये २.४० कोटी प्राप्त झालेले होते त्यामध्ये एकूण ४०२० शौचालय बांधकाम करुन १००% उद्दिष्ट व निधी खर्च करण्यात आलेला आहे.

अमृत ग्रीन सेस - सन २०१५-१६ मध्ये रक्कम रुपये ५०.०० लाख, सन २०१६-१७ मध्ये रक्कम रुपये ७५.०० लाख व सन २०१७-१८ मध्ये या तीनही वर्षामध्ये १००% खर्च झालेला आहे.

भूयारी गटर योजना - सन २०१७ मध्ये डीपीआर मंजूर झालेला असून केंद्र सरकार निधी रक्कम रुपये ३४.०० कोटी पैकी रक्कम रुपये २०.०० कोटी प्राप्त झालेले असून, प्राप्त निधीनुसार खर्च झालेला असुन उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेले असून, केंद्र व राज्य शासनाकडून अप्राप्त निधी रक्कम रुपये २०.०० कोटी असून, अमृत योजना सोडून सर्व योजनांचा खर्च १००% झालेला असल्याचे सभागृहास अवगत केले.

मा. अध्यक्ष - नगर पालिकेकडे प्रधानमंत्री आवास योजनेचे काम आहे काय अशी विचारणा केली.

Scanned with CamScanner

डॉ. प्रशांत रसाळ, मुख्याधिकारी - एकूण २८ झोपडपट्टी असून १६४६८ घरकुले करावयाचे असून, सर्वेक्षण पूर्ण झालेले आहे. दोन डीपीआर शासनाकडे मंजुरीस्तव सादर केलेले आहेत. यापैकी ७४ चा DPR मंजूर झालेला असून ६० DPR काल शासनाकडे पाठविण्यात आलेला असल्याचे सभागृहास अवगत केले.

मा. अध्यक्ष - नगरपालिकेकडील सर्व योजनांची माहिती Email द्वारे सर्व सन्मा. सदस्यांना सादर करणेबाबत मुख्याधिकारी, अंबरनाथ

नगर पालिका यांना सूचना दिल्या.

**अंबरनाथ नगरपरिषद -**

श्री. निलेश देशमुख, अभियंता यांनी अमृत योजनेमध्ये मल:निस्सारण योजना टप्पा २ वर असून, टेंडर काढल्यानंतर शासनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (MJP) कडे हस्तांतरीत केले आहे. सदर योजनेसाठी केंद्र व राज्य शासनाकडून रक्कम रुपये १४.१४ कोटी प्राप्त झाले व रक्कम रुपये ४.७१ कोटी असे एकूण रक्कम रुपये १८.८५ कोटी एमजेपी कडे निधी वर्ग केलेला आहे. MJP या विभागाने तयार केलेले डिझाईन त्यांच्या वरिष्ठ कार्यालयाकडे मंजूरीस्तव सादर करण्यात आलेले असून, प्रत्यक्ष काम सुरु झालेले नसून, एकूण रक्कम रुपये ४८.०० कोटीचे सदरचे काम असल्याचे सभागृहास अवगत केले.

मा.आमदार श्री. किसन कथोरे - सदरचे काम कधी मंजूर झाले अशी सभागृहास विचारणा केली असतां श्री. निलेश देशमुख, अभियंता यांनी केंद्र शासनाने सदर कामाकरिता दिनांक २८.६.२०१८ ला मान्यता दिलेली होती.

मा. अध्यक्ष - सन २०१८ मध्ये मान्यता दिलेली असतांना सदरचे काम सुरु होण्यास दोन वर्षाचा कालावधी का लागला असे विचारलेवर टेंडर काढल्यानंतर सदरची योजना शासनाने एमजेपी कडे हस्तांतरीत केल्यामुळे सदरचा वाढीव कालावधी लागला असल्याबाबत त्यांनी सभागृहास अवगत केले.

मा. आमदार श्री. किसन कथोरे - डीपीआर कोणी बनविला होता व टेंडर का आले नाही याची चौकशी केली का? अशी सभागृहास विचारणा केली. त्याबाबत श्री. निलेश देशमुख, अभियंता यांनी सांगितले की डीपीआर नगरपालिकेने बनविला होता. शासनाने नाले अडवून पंपींग बनविणे व एसटीपी बनविने असे काम त्यामध्ये घेतले होते.

मा. अध्यक्ष - सदर योजनेची माहिती एमजेपी कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन योजनेची माहिती सर्व सन्मा. सदस्य यांना Email द्वारे पाठविण्यात यावी अशा सूचना बदलापूर नगरपालिकेच्या अधिकारी यांनी दिल्या.

प्रधानमंत्री आवास योजनेची माहिती सभागृहाला द्यावी तसेच जागा हस्तांतरीत करीत नसल्याबाबतची वर्तमानपत्रामध्ये बातमी प्रसिध्द झालेली होती. त्याबाबत माहिती मागितली असतां, श्री. निलेश देशमुख, अभियंता यांनी एकूण २२८९८ घरकुले मंजूर असून, ठेकेदाराला मार्कींग करुन जागा दिलेली असून, संबंधित ठेकेदाराने ड्राईंग बनविलेले असून ते नगरपालिकेकडे सादर केलेले आहे.

मा. अध्यक्ष - सदर योजने साठी सर्व नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे का अशी विचारणा केली. त्यांनी, टाऊन प्लॅनिंगमध्ये चर्चा होऊन पर्यावरण विभागाकडील ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त होईल असे सभागृहास अवगत केले.

मा. अध्यक्ष - बदलापूर होम प्लॅटफॉर्मसाठी बैठक आयोजित करण्यात आलेली होती. लॅन्ड अॅक्वीझीशेनसाठी मा. आमदार महोदय यांचेशी चर्चा करुन लवकरात लवकर निर्णय घेणेबाबत सूचना दिल्या.

श्री. निलेश देशमुख, का.अभियंता - स्वच्छ भारत अभियान अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन यासाठी केंद्र सरकारकडील रक्कम रुपये ३.०० कोटी व राज्य शासनाकडील रक्कम रुपये २.४० कोटी प्राप्त झालेले असून त्यामध्ये केलेल्या खर्चापोटी रक्कम रुपये ४.८८ कोटी खर्च झालेला असल्याचे सभागृहास अवगत केले.

**जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, कृषि विभाग, ठाणे :-**

मा. अध्यक्ष - आपल्या विभागासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार यांचेकडील किती निधी प्राप्त झाला याबाबत माहिती द्यावी अशी विचारणा केली. त्यावर, श्री. अंकुश माने जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी (१) ठिबक सिंचन - या योजनेसाठी मागील वर्षी रक्कम रुपये २५.८२ लाख प्राप्त झाले होते. त्यापैकी, रक्कम रुपये २०.०० लाख खर्च झालेला असून, यावर्षी निधी प्राप्त झालेला नसल्याचे सभागृहास अवगत केले. (२) एकात्मिक पाणलोट कार्यक्रम - बॅच ३ चे काम पूर्ण झालेले असून बॅच ५ चे काम सुरु असून, मार्च २०२१ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून, बॅच ६ ला स्थगिती असल्याचे सभागृहास अवगत केले. (३) प्रधानमंत्री फसल पिक विमा योजना - मागील वर्षी सदर योजनेमध्ये एकूण ३३७ लाभार्थ्यांना लाभ दिलेला असून, त्यासाठी रक्कम रुपये ९.३२ कोटी प्राप्त झालेले होते. मा. अध्यक्ष - ठाणे जिल्हयामधिल शेतकऱ्यांची संख्या किती याबावत माहिती द्यावी अशा सूचना केल्या. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी ठाणे जिल्हयामध्ये एकूण १,४१,००० शेतकरी असल्याचे सभागृहास अवगत केले. यावर, मा.अध्यक्ष यांनी ठाणे जिल्हयामध्ये एवढया मोठया प्रमाणात शेतकरी असून इतर शेतकऱ्यांना सदर योजनेमध्ये भाग घेण्यासाठी आपण प्रोत्साहित करु शकत नाही काय अशी विचारणा केली.

त्यास अनुसरुन, श्री माने यांनी सांगितले की, यावर्षी मा. जिल्हाधिकारी यांचेमार्फत एकूण चार बैठका आयोजित करण्यात आलेल्या असून, मागील वर्षीची शेतकरी संख्या लक्षात घेता, यावर्षी आपण अडीच पट जादा काम केलेले असल्याचे सभागृहास अवगत केले.

Scanned with CamScanner

मा.अध्यक्ष - ठाणे जिल्हयातील शेतकरी हा एक पिक घेणारा शेतकरी असल्यामुळे मा. जिल्हाधिकारी महोदय यांचे मार्गदर्शनानुसार या योजनेची जास्तीत जास्त जनजागृती करुन योजनेमध्ये जास्तीत जास्त शेतकऱ्यांचा कसा समावेश होईल या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक असलेचे सांगून, तालुका स्तरावर पंचायत समितीमधिल तसेच तालुका कृषि अधिकारी यांचेमार्फत योजनेला प्रसिध्दी देणेबाबत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सूचना दिल्या.

राष्ट्रीय भात विकास कार्यक्रम - National Food Security Mission मध्ये कडधान्यांचा कार्यक्रम केलेला असून यावर्षी कडधान्याच्या क्षेत्रामध्ये वाढ केलेली असून, बांधावर तूर लागवड हा कार्यक्रम आपल्या सर्वांच्या सहकार्याने चांगल्या प्रकारे आयोजित केलेला असून, त्याखाली यावर्षी चौपट क्षेत्र उत्पन्न आले असल्याचे सभागृहास अवगत केले. त्याचप्रमाणे जिल्हयामध्ये गटशेतीचा कार्यक्रम चांगल्या प्रकारे राबविण्यात आलेला असून एकूण ११ गटांचा कार्यक्रम यशस्वीपणे राबविला असून, त्यातील ६ गटांचे काम अतिशय चांगले असून, सामुहिक सिंचन सुविधा उपलब्ध असल्याचे सभागृहास अवगत केले.

मा.अध्यक्ष - गट शेतीसाठी सरकारने योजना केलेली होती सरकारकडून त्यासाठी निधी वितरीत करण्यात आला होता. परंतु, मुरबाड तालुक्यामध्ये ६ गट चांगले असूनरुंदे येथील १ गटाने १०० एकर बागाईत क्षेत्र झालेले आहे. याबाबत सविस्तर माहिती द्यावी अशा सूचना दिल्या.

श्री.माने यांनी एकुण ११ गटांचा कार्यक्रम यशस्वीपणे राबविला असून, त्यातील ६ गटांचे काम अतिशय चांगले असून, रुंदा-कल्याण, सामुहिक सिंचन योजना १०० एकर बागाईत झालेले आहे. रब्बीमध्ये चांगला कार्यक्रम घेण्यात येणार आहे. मा.अध्यक्ष यांनी गटांना आतापर्यंत किती निधी प्राप्त करुन दिला याबाबत माहिती द्यावी अशा सूचना केल्या. त्यावर, श्री माने यांनी एकूण रक्कम ३.९६ कोटी अनुदान स्वरुपात दिलेले असून, त्यामध्ये ३० टक्के स्वनिधी , गटाला प्रत्येकी रक्कम रुपये १.०० कोटीची मर्यादा होती. त्यामध्ये तळवली मुरबाड रुपये ९०.०० लाख एवढी रक्कम दिलेली आहे. यावर, मा.श्री. किसन कथोरे, आमदार यांनी लोकांच्या अनेक तक्रारी असून, मा. खासदार मा. आमदार यांना सोबत घेऊन क्षेत्रीय भेटी कराव्यात अशी सूचना केली. तसेच, लोकप्रतिधिंना याबाबत माहिती नसल्याबाबत नाराजी व्यक्त केली. त्यावर, मा.अध्यक्ष यांनी दिनांक १ ऑक्टोबर २०२० नंतर क्षेत्रीय भेटीसाठी तारीख व वेळ घेण्यात यावी, जेणेकरुन सर्वांसोबत एकत्रित क्षेत्रीय भेटी देण्यात येतील अशा सूचना जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांना दिल्या.

जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी -यांनी पुढे असे सांगितले की, राष्ट्रीय कृषि विकास योजनेमध्ये भात विकास कार्यक्रम घेण्यात आलेला असून त्यामध्ये एकूण ४४३ शेती शाळा घेण्यात आलेल्या आहेत. यामध्ये बियाणे निवडी/प्रक्रिया पासून ते लागवड, पिकाच्या चाळणी/काढणी पर्यंत प्रत्यक्ष शेतावर प्रात्याक्षिक घेण्यात आले असल्याचे सभागृहास अवगत केले.

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी कल्याण -२ -**

एम.एस.ई.बी. कल्याण अंतर्गत दोन योजना असून या योजनेमध्ये केंद्र सरकारचा रक्कम रुपये ११५.०० कोटी व रक्कम रुपये ३८.०० कोटी असा एकूण रक्कम रुपये १५३.०० कोटी निधी प्राप्त झाला असून, त्यामध्ये नवीन ट्रान्सफॉर्मर व वाहिन्या बसविणे ही कामे घेण्यात आली असून, कल्याण - १ मध्ये ९३% काम झालेले असल्याचे अवगत केले.

मा.अध्यक्ष - तालुकानिहाय ट्रान्सफॉर्मर पुरविण्यात आल्याची विगतवारी व साधारण एका ट्रान्सफार्मरची किंमत याबाबत माहिती देण्यात सर्वांना देवून सद्यस्थिती सभागृहास अवगत करावी अशा सूचना केल्या.

श्री. काकडे, अधिक्षक अभियंता, कल्याण असे सांगितले की, एकूण १३७ पैकी ९४ चा पुरवठा झालेला आहे. ट्रान्सफार्मरच्या क्षमतेवर (capacity) वर किंमत अवलंबून असून अंदाजे रक्कम रुपये ३.०० ते ४.०० लाख एवढया किंमतीपर्यंत एक ट्रान्सफॉर्मर ची किंमत असल्याचे सभागृहास अवगत केले. त्यामध्ये २२ के बी च्या वाहिन्या, लघुदाब वाहिन्या हे कामही करण्यात आलेले असल्याचे सभागृहास अवगत केले.

मा. अध्यक्ष - ट्रान्सफार्मर, वाहिन्या व इतर तालुका निहाय, किती ठिकाणी, एका ट्रान्सफार्मरची क्षमतेनिहाय विगतवारी माहिती Email वर देण्यात यावी अशा सुचना दिल्या.

मागच्या वर्षी दिनदयाळ योजनेमधुन रक्कम रुपये ९०.०० कोटी प्राप्त झालेले होते त्याबाबतच्या निविदा झालेल्या होत्या त्या निविदेमधील सर्व काम झाले किंवा कसे याबाबतची माहिती द्यावी अशा सुचना दिल्या.

श्री. काकडे, अधिक्षक अभियंता, कल्याण -

सदरचे टेंडर रद्द करण्यात आलेले असून, शहापूर व मुरबाड तालुक्यासाठी रक्कम रुपये ६.०० कोटी प्रत्येकी स्वतंत्र टेंडर काढण्यात आलेले असून, त्यामध्ये ९०% काम झालेलेअसल्याचे सभागृहास अवगत केले.

मा. अध्यक्ष - सदर शहापूर व मुरबाड तालुक्यातील टेंडर बाबतची व केलेल्या कामाची माहिती Email वर देण्यात यावी अशा सुचना दिल्या.

Scanned with CamScanner

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, ठाणे शहर -**

ठाणे शहर आयपीडीएस योजनेमध्ये १००% काम पूर्ण झालेले असून, रक्कम रुपये १५.५६ कोटी , त्याचप्रमाणे भिवंडी मधील काम सुरु असून त्यासाठी, रक्कम रुपये २९.०० कोटीचे ट्रान्सफॉर्मर टाकले असलेचे सांगितले असतां त्याबाबत सविस्तर माहिती E-mail वर देणेबाबत एम एस ई बी ठाणे यांना मा अध्यक्ष यांनी सांगितले प्राप्त झालेले असल्याचं सभागृहास अवगत केले.

मा.अध्यक्ष - भिवंडीमध्ये वीज पुरवठा करणारी टोरँटो विद्युत कंपनी ही खाजगी कंपनी असून, शासन त्या ठिकाणी का खर्च करीत असल्यामुळे नाराजी व्यक्त करुन, भिवंडी ऐवजी इतर तालुक्यांमध्ये सदरचा निधी वापरल्यास त्या तालुक्यांना फायदा होईल असे मत व्यक्त करुन याबाबतची कंत्राटदारासह सविस्तर माहिती Email वर देण्यात यावी तसेच क्षेत्रीय भेटीसाठी माझी तारीख व वेळ घेण्यात यावी अशा सुचना ठाणे शहर विभागाचे अधिकारी यांना सूचना दिल्या.

**बी.एस.एन.एल. कल्याण श्री. सोळंकी -**

मा. अध्यक्ष - बीएसएनएल च्या मोबाईल सेवेमध्ये सुधारणा करुन, ग्रामीण भागातील जनतेला जास्तीत जास्त सुविधा दिल्यास त्याचा फायदा होईल. शहरी भागामध्ये BSNL चे कार्ड कोणीही खरेदी करीत नाही. त्यामुळे, ग्रामीण भागातील ज्या परिसरामध्ये खाजगी कंपनीचे नेटवर्क पोहचू शकत नाही, अशा ठिकाणी BSNL ने चांगल्या प्रकारचे मोबाईल नेटवर्क देणेबाबत सूचना दिल्या.

मा. आमदार, श्री. किसन कथोरे - मुरबाड तालुक्यामध्ये मोबाईल टॉवर असून सुध्दा रेंज मिळत नाही. ग्रामीण भागातील सेवा सुधारण्यात यावी, सागाव, कारद या परिसरामध्ये नेटवर्कची वाईट स्थिती असल्याचे सभागृहाचे निदर्शनास आणून दिले.

मा. अध्यक्ष - बीएसएनएल बाबत वृत्तपत्रामध्ये कर्मचारी कपातीची बातमी वाचली आपल्या विभागातील कर्मचारी कपात झाली काय अशी विचारणा केली.

बीएसएनएल कल्याण श्री. सोळंकी - BSNL मधील ५०% कर्मचारी कपात झालेली असून, निधीची कमतरता असल्यामुळे कंत्राटी पध्दतीने कर्मचारी घेण्यात येत असल्याचे सभागृहास अवगत केले. यावर मा.अध्यक्ष यांनी ग्रामीण Interior भागात म्हणजे वाडा, मुरबाड, शहापूर येथे चांगली सेवा दिली तर ग्रामीण भागातील लोकांनाही फायदा होईल. तरी, त्यावर आपण लक्ष केंद्रित करा असे सांगितले.

**ठाणे महानगरपालिका- वॉटरवेज :**

मा.अध्यक्ष - यांनी वॉटरवेजबाबत विचारणा करतांना, ठाणे म.न.पालिकेचे कार्यकारी अभियंता यांना दिल्ली येथील बैठकीमध्ये भिवंडी येथील अंजूर-दिवे येथे स्टॉप घेणेबाबत मुद्दा मांडण्यात आलेला होता. त्याबाबत, चर्चा होऊन तो मंजूरही झाला होता. परंतु दोन-तीन दिवसांपूर्वी लोकमत या वृत्तपत्रामध्ये बातमी प्रसिध्दी झालेली आहे. त्या अनुषंगाने सदरचे काम वगळले किंवा कसे याबाबत माहिती द्यावी अशा विचारणा केली. त्यावर, श्री. मोहन कलाल, कार्यकारी अभियंता यांनी अंजूर-दिवे व काल्हेर येथे स्टॉप घेणेबाबत निश्चित झाले असल्याचे सभागृहास अवगत केले. तसेच, सदरचे काम मेरीटाईम बोर्डकडे दिले असलेबाबत सांगितले. मेरीटाईम बोर्डाच्या अधिकाऱ्यांसह क्षेत्रीय पाहणी केलेली असून, डीपीआर हस्तांतर केलेला असलेबाबतही त्यांनी सभागृहास अवगत केले.

मा.अध्यक्ष - जे.टी. बनविण्यासाठी निविदा प्रक्रिया कधी करणार अशी विचारणा करुन याबाबत माहिती मला पाठवावी अशी सूचना केली. सदर कामासाठी अंदाजे एक महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता असल्याचे श्री. मोहन कलाल, कार्यकारी अभियंता यांनी सभागृहास अवगत केले.

मा. अध्यक्ष - कोविड च्या परिस्थितीमध्ये संबंधित अधिकारी online उपस्थित राहून चांगल्या प्रकारे माहिती दिलेली आहे. महानगरपालिका व विभागांना ज्या-ज्या सूचना दिलेल्या आहेत त्याप्रमाणे Email द्वारे सर्व सन्मा. सदस्यांना देण्यात यावी. त्याचप्रमाणे दिनांक १ ऑक्टोबर नंतर आयोजित करावयाच्या बैठकीसाठीची तारीख व वेळ संबंधित मनपा यांनी मा. अध्यक्ष व मा. खासदार यांचेशी चर्चा करुन घेऊन बैठकीचे आयोजन करावे. त्याचप्रमाणे केंद्र सरकारचा प्राप्त झालेल्या निधीमधून ग्रामीण व शहरी भागातील जनतेला जास्तीत जास्त सुविधा कशा प्रकारे पुरविता येतील याप्रकारे योजनानिहाय कामाचे नियोजन करुन निधी १००% खर्च होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावा अशा सुंचना सर्व मनपा व संबंधित विभागांचे अधिकारी यांना दिल्या.

सभेच्या शेवटी प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ठाणे यांनी दि.१०/९/२०२० रोजी दिशा समितीच्या बैठकीस उपस्थित मा. अध्यक्ष, श्री.कपिल पाटील साहेब, मा.जिल्हाधिकारी, ठाणे, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.ठाणे तसेच Online उपस्थित असलेले मा.आमदार, महानगरपालिकांचे मा.आयुक्त, मा.महापौर तसेच इतर विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहिल्याबाबत सर्वांचे आभार मानून, मा. अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहिर केले.

| | | |
|---|---|---|
| प्रकल्प संचालक<br>जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,<br>ठाणे | जिल्हाधिकारी,<br>तथा सदस्य सचिव,<br>दिशा समिती, ठाणे | मा.श्री.कपिल मोरेश्वर पाटील,<br>अध्यक्ष<br>दिशा समिती, ठाणे |

Scanned with CamScanner